वि.दि.दावा क्र. ७८/२०२३
रविंद्र वि. सुमन
निशाणी क्र.६४

वादीतर्फे साक्षीदार क्र.१ प्रबीर प्रफुल डे –

**साक्षीदाराचा सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ सारंग देवळे यांच्यातर्फे**

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला मराठी भाषेमध्ये समजावुन सांगण्यात आला. त्यावर मी वाचुन, समजुन त्यावर सही केली आहे.

२. साक्षीदाराला निशानी ४२ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की सदरचे खरेदीपत्र माझ्यासमक्ष दिनांक २४/०५/१९९० रोजी झाले होते. मी सदर खरेदीपत्रावर साक्षीदार म्हणुन क्रमांक २ वर सही केली होती.

**साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे श्री. व्ही. आर. बोरकर यांद्वारे** –

३. मी कायमस्वरुपी नागपुरचा राहणारा आहे. मी कॅम्पाकोला कंपनीतुन रिटायर झालो आहे. मी कंपनीत काम करत असल्याबाबतचा पुरावा आज रोजी आणला नाही. हे म्हणणे खरे नाही की रंजनासोबत माझी कोणतीही ओळख नाही. खरेदीपत्र हे १९८९-९० चे आहे. मी त्यावेळेस नागपुर मध्ये राहत होतो. माझे माझ्या मित्रासोबत खरेदीपत्राच्या जागेवर जाणेयेणे होते. नागपुर ते पारशिवनी अंदाजे ६० ते ६५ किलोमीटर अंतर आहे. खरेदी पत्राच्या आगोदर जागा पाहण्यासाठी आलो होतो. मी एजाज सलीम खान यांच्यासोबत येत होतो. वादी हे बाहेर राहत होते, त्यांची पत्नी राहत होती. खरेदीपत्रावर सही करण्याच्या आगोदर मी वाचले होते. मी खरेदीपत्रामधील गट नंबर आहे आणि क्षेत्र सांगु शकत नाही कारण बरेच वर्ष झाले. अंजनाबाईने जमिन खरेदी केली होती. कोणाकडुन खरेदी केले होते त्याचे नाव मला आज रोजी आठवत नाही. दोन महिला आणि एक पुरुष विक्री करणारे होते. त्यावेळेस त्यांच्याजवळ मतदान कार्ड होते. मी मतदान कार्ड पाहिले नव्हते. दोन लोकांनी सही केली होती आणि एकाने अंगठा केला होता. हे म्हणणे खरे नाही की खरेदी पत्राच्या वेळी मी नव्हतो आणि मित्राच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.३ तर्फे श्री. चक्रवर्ती यांद्वारे** –

हे म्हणणे खरे नाही की खरेदी पत्र खोटे आहे. खरेदीपत्राच्या जमिनीच्या चतुर्सिमा मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की मी एजाजखानची जमिन सोडुन इतर जमिनीमध्ये जात नव्हतो. हे मी सांगु शकत नाही की पारशिवनीवरुन मी कोणत्या ठिकाणी जमिन पाहण्यासाठी जात होतो. हे

म्हणणे खरे नाही की मी कधी जमिन पाहण्यासाठी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की कोणत्याही मित्रासोबत जमिन पाहण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की खरेदीपत्रावर साक्षीदार म्हणुन माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

L.A.R. No. 106-2005

SARODE SANDEEP MARUTI

Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.12.20 17:40:10 +0530

दिनांक २०.१२.२०२५ (एस.एम. सरोदे)

रामटेक दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : Shri. R. J. Khobragade (Gr.-II)